# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ७१ वी बैठक दिनांक १६ जानेवारी २०१३

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७१वी बैठक दि. १६ जानेवारी २०१३ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | वि.स.स. व उपाध्यक्ष (मकृखोविम) |
| ३. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | प्रधान सचिव (जसं) व सदस्य |
| २. | मा. श्री. व्ही. गिरीराज | ... | प्रधान सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ३. | इं. शि. मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**विशेष निमंत्रित**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | मा. उपाध्यक्ष |
| २. | श्री. निमिष राजाध्यक्ष | ... | भागीदार चोखरा आणि गांधी, सनदी लेखापाल |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.जी. सातपुते | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. कि. व. वाहुल | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अविनाश सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**“मान्य”**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. शि. मा. उपासे)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची ७१ वी बैठक दिनांक १६ जानेवारी २०१३

## ठराव

**ठराव क्रमांक ७१/१**

"नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

**ठराव क्रमांक ७१/२**

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७० व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

**ठराव क्रमांक ७१/३**

"ठराव करण्यात येतो की, पिंपळगांव जोगे डावा कालवा सा.क्र.१४/१३० येथील बॉक्स कलव्हर्ट (Box Culvert) बांधकामाची सेवापथाच्या बाजूस पक्षभिंत अचानक कोसळून फुटल्यामुळे झालेल्या शेतीचे नुकसानी भरपाई रक्कम रु. ४,४३,४३३/- (रु. चार लक्ष त्रेचाळीस हजार, चारशे तेहतीस फक्त) संबंधीतास अदा करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ७१/४**

"ठराव करण्यांत येतो की, सीना माढा उपसा सिंचन योजनेतंर्गत मुख्य कालव्यावरील कि. मी. १२ व १३ चे कामासाठी अंतिम निवाडयातून वगळलेल्या तालींचा मोबदला रु.१,२९,९२२/- (अक्षरी एक लक्ष एकोणत्तीस हजार नऊशे बावीस फक्त) शासन परिपत्रक क्र. एसक्यूएन./ १८८९/ (४१७४)/ प्रक्र.१००/आ.२, दि. २१-०९-१९९२ च्या परिपत्रकातील निर्देशानुसार संबंधित शेतक-यांना अदा करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

**ठराव क्रमांक ७१/५**

"ठराव करण्यांत येतो की, श्री. ज्ञा. द. शिंदे, वकील यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे "कायदे सल्लागार" पदी दिनांक ०१/०९/२०१२ ते ३१/०८/२०१३ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधीन राहून दरमहा रु. ३०,०००/- इतके मानधन

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची ७१ वी बैठक दिनांक १६ जानेवारी २०१३

व दिल्ली, मुंबई येथील दौ-यासाठी रु. ५००/- दर दिवशी व इतर ठिकाणी रु. ३००/- दर दिवशी एवढा दैनिक भत्ता अदा करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”

ठराव क्रमांक ७१/६

“ठराव करण्यात येतो की, तारळी प्रकल्पाचे ए.आय.बी.पी. अंतर्गत आर्थिक व भौतीक उद्दिष्ठ अंशतः साध्य होण्याच्या दृष्टीने आणि खटाव व माण तालुक्यातील तारळी प्रकल्पांतर्गत नियोजीत सिंचन क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने, कोपर्डे पोहोच कालव्याच्या बोगदा व बंदिस्त पाईप लाईनचे काम प्रकल्पाचा चतूर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल मान्य होईपर्यंत मंजूर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेमधील व ए.आय.बी.पी. अंतर्गत कोपर्डे पोहोच कालव्यासाठी असणाऱ्या आर्थिक तरतूदीच्या मर्यादेत करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्रमांक ७१/७

“ठराव करण्यांत येतो की, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना पुणे सोलापूर चारपदरी महामार्गासाठी पाटबंधारे वसाहत यवत, ता. दौंड येथील शासकीय जमीन / जागा / निवासी / अनिवासी इमारती / तार कंपाऊंड अशी एकूण ५७०० चौ. मी. क्षेत्र व लोखंडी गेट ४ नग, झाडे ५२ याची शासकीय दराने येणारी रक्कम महामंडळास मिळण्याच्या अटीवर, जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून मागणी आल्यास, त्यांचेकडे जमीन वर्ग करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.”

ठराव क्रमांक ७१/८

''ठराव करण्यांत येतो की, सन २०११-१२ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेखा महामंडळाचे सनदी लेखापाल यांनी तयार केला असून त्यास या ठरावाद्वारे नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्रमांक ७१/९

“सन २०११-१२ मधील सिंचनक्षमता निर्मिती उद्दिष्टे, पाणीसाठा निर्मिती उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्य तसेच सन २०१२-१३ मधील सिंचन क्षमता उद्दिष्टे व पाणीसाठा निर्मिती उद्दिष्टे यांची माहिती नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केली असल्याने याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आलेला नाही.”

“मान्य”

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची ७१ वी बैठक दिनांक १६ जानेवारी २०१३

ठराव क्रमांक ७१/१०

"ठराव करण्यात येतो की, खडकवासला प्रकल्पाची पुणे महानगरपालिका हद्दीतील मुठा उजवा कालव्याच्या काठावरील मौ. वडगाव बु. येथील नवीन मुठा उजवा कालवा सा.क्र. ९/०० ते १२/४५० पर्यंत जुना मुठा उजवा कालवा व नवीन मुठा उजवा कालवा या मधील एकूण २७६०० चौ.मी. जमीन वृक्षारोपणाकरीता स्वतंत्र करारनामा करुन महामंडळाचा मालकी हक्क कायम ठेवून पुणे महानगरपालिकेस देण्याचे प्रस्तावास खालील अटींचे अधीन नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अट-१: महापालीकेने सदर जागेचा वापर कोणत्याही व्यावसायीक कारणासाठी करु नये.

अट-२: सदर जागा महामंडळाच्या मालकीची असल्याने, त्यावर इतर कोणतेही अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी पुणे महानगरपालीकेची राहील.

अट-३: भविष्यात सदर जमिनीवर पुणे महानगरपालीकेचा कोणताही हक्क राहणार नाही.

ठराव क्रमांक ७१/११

"ज्ञानभारती सामाजिक सेवा संस्था, सातारा या संस्थेस मोकळी जागा व शेड भाडेपट्टयाने दिलेल्या करारानाम्यास मुदतवाढ देणेबाबत या विषयावर चर्चेअंती सदर प्रकरणी मुदतवाढ देण्यात येऊ नये असे ठरल्याने कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

ठराव क्रमांक ७१/१२

"मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर येथील शासकीय वसाहतीमधील कराराने हॉटेल व्यवसायासाठी भाडेतत्वावर देण्यांत आलेल्या जागेऐवजी दुसरी जागा देणे व करारास मुदतवाढ देणेबाबत या विषयावर चर्चेअंती सदर प्रकरणी मुदतवाढ देण्यात येऊ नये असे ठरल्याने कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

ठराव क्रमांक ७१/१३

"कण्हेर धरणासाठी संपादित केलेल्या मौजे आकले येथील गट क्र.६२ मधील हॉटेल व्यवसायासाठी भाडेतत्वावर दिलेल्या जमिनीचे कराराचे नूतनीकरण करणेबाबत या विषयावर

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची ७१ वी बैठक दिनांक १६ जानेवारी २०१३

**चर्चेअंती सदर प्रकरणी मुदतवाढ देण्यात येऊ नये असे ठरल्याने कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.”**

**ठराव क्रमांक ७१/१४**

**“निरा देवघर प्रकल्पाचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारीतून पूर्ण करण्याचे दृष्टीकोनातून प्राथमिक व्यवहार्यता अहवाल तयार करणेसाठीच्या खर्चास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबतचा विषय नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत फेरसादर करण्याचे ठरले असल्याने कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही”**

**ठराव क्रमांक ७१/१५**

**“ठराव करण्यांत येतो की, टेंभू उपसा सिंचन प्रकल्पातंर्गत पुणदी व विसापुर उपसा सिंचन योजनेचा समावेश असलेल्या प्रकल्प अहवालास केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीने (TAC) दिलेली मान्यता, त्यानंतर केंद्रीय नियोजन मंडळाने दिलेली मान्यता, राज्य शासनाकडून या योजनेस प्राप्त झालेली तत्वतः मान्यता व शासन स्तरावर मान्यतेच्या अंतिम टप्प्यात असलेला द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल तसेच योजनेचे लाभक्षेत्र अवर्षण प्रवण क्षेत्रात असल्याने कायम स्वरुपी उपाय योजनेची गरज लक्षात घेऊन द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळेपर्यंत प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत योजनेचा खर्च ठेवण्याच्या अटीवर टप्पा-१ ब मधून आरफळ कालव्यात पाणी टाकण्याची योजना तसेच विसापूर व पुणदी या उपसा सिंचन योजनेची कामे सुरु करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”**

**ठराव क्रमांक ७१/१६**

**“ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या अधिपत्याखालील वरसगांव, पानशेत, प्रकल्पांतर्गत संपादीत करण्यांत आलेली मांजरी बु.// येथील गट नं. १८१ मधील ८९ एकर (३६ हेक्टर) जमीन सध्या वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, मांजरी बु.// पुणे यांचेकडे महामंडळ स्थापन होणेपुर्वी पासून दिनांक ०१/०४/१९९४ पासून ते दिनांक ३१-०३-२०१५ पर्यंत कराराने दिलेली आहे. सदरची जमीन महामंडळाच्या कामासाठी उपयोगात येणार नसल्याने जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”**

तद्‌नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |